# कोविड रोखण्यासाठी पॉलिमरचे नॅनो कोटिंग

## बहुराष्ट्रीय कंपनीच्या प्रायोगिक प्रकल्पासाठी शिवाजी विद्यापीठात संशोधन

**ओंकार धर्माधिकारी** : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : घर किंवा दवाखान्याचा दरवाजा, खिडकी किंवा पार्टिशनची काच, पडदे यांना जर विशिष्ट पॉलिमरचे नॅनो कोटिंग केले तर कोविड विषाणूचा प्रादुर्भाव रोखता येतो, असा संशोधकांचा दावा आहे. याबाबतचे संशोधन शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागात सुरू आहे. अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपनीचा हा प्रायोगिक प्रकल्प



असून त्यासाठी नॅनो सायन्स विभागाला दहा हजार डॉलरचा निधीही देण्यात येणार आहे.

अमेरिकेतील होस्टन शहरातील क्रेटॉन पॉलिमर या बहुराष्ट्रीय कंपनीने कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विशिष्ट प्रकारचे पॉलिमर बनवले. **पान १० वर »**

**भविष्यात विषाणूजन्य आजारांना रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून नॅनो स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये सुरू असणारे हे मूलभूत संशोधन आहे. नॅनो कोटिंग केल्यामुळे कोविडसह सार्स फॅमिलीमधील विषाणूंना रोखणे शक्य होईल.**

**- प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा,**
उपसंचालक, नॅनो स्कूल ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी

### असे रोखणार विषाणू

कोरोनाबाधित व्यक्ती शिंकली किंवा खोकली की थुंकीवाटे कोविडचे विषाणू त्या ठिकाणी पसरतात. त्या ठिकाणी ते चिकटून राहतात. अन्य व्यक्तींचे हात तेथे लागले तर पुढे संसर्गाची साखळी तयार होण्याची भीती असते. अशा ठिकाणी नॅनो कोटिंग असेल तर हे विषाणू चिकटून राहत नाहीत. विशिष्ट पॉलिमरमुळे ते निष्क्रिय होतात. यामुळे कोविड विषाणूंचा प्रादुर्भाव रोखता येतो, असा संशोधकांचा दावा आहे.

# कोविड रोखण्यासाठी पॉलिमरचे नॅनो कोटिंग

» पान १ वरून

या पॉलिमरवर प्रक्रिया करून त्याचा नॅनो कोट बनवण्याचा प्रायोगिक प्रकल्प स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाला देण्यात आला. हा प्रकल्प दोन भागात असून काम सुरू झाले आहे. ते ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होईल. पॉलिमरवर प्रक्रिया करून नॅनो कोट बनवण्यात येतो. हा कोट कोणत्याही पृष्ठभागावर, कपड्यावर करता येईल. या कोटचा वापर करून मास्क, पीपीई किटही बनवता येऊ शकतील. दवाखाना, कार्यालय, घर आदींच्या भिंती किंवा काचेचे पार्टिशन, दरवाजे, पडदे यावर हे नॅनो कोटिंग करता येते. यामुळे कोविड किंवा सार्स फॅमिलीमधील विषाणूंचा प्रादुर्भाव रोखता येतो, असा संशोधकांचा दावा आहे. या विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. किरणकुमार शर्मा प्रकल्पाचे प्रमुख आहेत. विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रमोद पाटील आणि सहायक प्रा. डॉ. किरण पवार या प्रकल्पावर संशोधन करत आहेत.

**नॅनो कोटिंगचे प्रकार**

- डीप कोटिंग - कोणत्याही पृष्ठभागावर
- स्प्रे कोटिंग - काचेवरील १० मायक्रॉनचा पारदर्शक कोट
- इलेक्ट्रो स्पिनिंग - प्रक्रिया केलेल्या पॉलिमरचे २०० ते ३०० नॅनो मीटरचे धागे

# उद्यानविद्या, व्यवस्थापनासाठी प्रवेश

कोल्हापूर : गार्डन्स क्लब व लोकविकास केंद्र शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने उद्यानविद्या व रोपवाटिका व्यवस्थापन हा अभ्यासक्रम घेतला जातो. या अभ्यासक्रमात कचरा व्यवस्थापन, बागेचा आराखडा तयार करणे, औषधी वनस्पती, किचन गार्डन, रानभाज्या, सेंद्रिय खते, बोन्साय, टेरारिअम, पूष्परचना आदी विषयांवर व्याख्यानासाठी तज्ज्ञांना निमंत्रित केले जाते. विविध नर्सरी, फ्लॉवर शोज, ग्रीन हाऊस, वनस्पती उद्यान या ठिकाणी प्रात्यक्षिक दिले जाते. हरित प्रयोगांचे शाश्वत प्रशिक्षण देणाऱ्या या शाळेत प्रवेश प्रक्रियेसाठी गार्डन्स क्लबशी संपर्क साधण्याचे आवाहन गार्डन्स क्लबतर्फे केले आहे.

## अवतीभवती

# प्रवेश परीक्षा अर्जासाठी १० जुलैपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या २०२० -२१ या शैक्षणिक वर्षातील एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यास १० जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. २०२० ते २१ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठ अधिविभागांत व संलग्नित महाविद्यालयांत शिकविल्या जाणाऱ्या एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज करावयाचे आहेत. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन अर्ज करण्यासाठी माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आहे.

# अर्ज करण्यास १० जुलैपर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील एम. एस्सी. व तत्सम अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यास दि. १० जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.तसेच, कोविड-१९चा प्रादुर्भाव लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या हितास्तव नियमित शुल्क भरुन ऑनलाईन अर्ज सादर करण्यात यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.